सकाळ यशोगाथा

बुधवार, १ जून २०११

# अथक परिश्रमानंतर 'सारा' प्रवास सुखाचा



सीताराम अग्रवाल



**स्थापत्य अभियांत्रिकीची पदविका प्राप्त करून सीताराम अग्रवाल यांनी सरकारी नोकरी केली. त्यानंतर खासगी कंत्राटदार म्हणून काम करताना अनेक चढउतार पचविले. हलाखीच्या परिस्थितीतून फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेऊन आज ते प्रथितयश बिल्डर म्हणून ओळखले जातात. मेहनतीला पर्याय नसतो; तसेच अथक परिश्रमानंतर पुढचा प्रवास सुखाचा असतो हे त्यांच्या कार्यपद्धतीवरून दिसून येते.**

अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते इसापूर प्रकल्पावर अभियंते म्हणून रुजू झाले. तेथून १९८० मध्ये सीताराम अग्रवाल औरंगाबादेत आले. अजंठा फार्मास्युटीकल्सचे पुरुषोत्तम अग्रवाल हे त्यांचे मामा. याच कालावधीत 'अजंठा'ची उभारणी सुरू होती. श्री. अग्रवाल यांना यात काम मिळाले. यासोबत कंत्राटदारीचा व्यवसाय सुरू केला. याच कालावधीत औरंगाबादेत 'सिडको' आले. श्री. अग्रवाल यांनी सिडकोतील कामे घेणे सुरू केले. सध्याच्या सिडको कार्यालयाची संरक्षक भिंत त्यांनीच बांधली आहे. दरम्यान, नाशिकमध्ये १९८६ मध्ये सिडकोचा प्रकल्प सुरू झाला. श्री. अग्रवाल यांनी तेथे ४२६ घरे बांधली. छोटी मोठी कामे सुरू होती, पण त्यातून अर्थार्जन म्हणावे तेवढे नव्हते. १९८६ ते १९९५ हा काळ अग्रवाल कुटुंबीयांसाठी अत्यंत खडतर होता.

लहान मुलाला शाळेत प्रवेश देण्यासाठी एक हजार रुपये त्यांच्याकडे नव्हते. त्यामुळे त्याला एकवर्ष उशिराने शाळेत टाकावे लागले. पैसा नसल्याने हातात असलेल्या व्यवसायाची देखभाल, दुरुस्ती शक्य नव्हती. साधे घर चालविणेही अशक्य होते. श्री. अग्रवाल यांच्या पत्नी श्रीमती अग्रवाल यांनी लिक्विड सोप, स्वेटर विणून संसारास हातभार लावला. १९९५ मध्ये पुन्हा एकदा सिडकोची कामे मिळाली. १९९७ पर्यंत कर्जाचे ओझे त्यांच्यावर होते. अजंठा फार्माने वाळूज औद्योगिक वसाहतीत प्लँट उभारण्याचे ठरविले आणि तिथे श्री. अग्रवाल यांना काम मिळाले. आयुष्यातील ही शेवटची संधी आहे असे समजून त्यांनी दिवसरात्र मेहनत केली. हाच खरा त्यांच्या आयुष्याचा टर्निंग पॉइंट होता. 'अजिंठा फार्मा'ने रशियात कारखाना उभारणी सुरू केली. तिथे सुपरव्हिजनची जबाबदारी श्री. अग्रवाल यांच्यावर सोपविण्यात आली. दोन वर्षे हे काम सुरू होते. १५ दिवस रशिया आणि १५ दिवस औरंगाबाद असा त्यांचा प्रवास असायचा. सिडको एन-एक मध्ये त्यांचा एक प्लॉट होता. तिथे पाच फ्लॅटची रूपनील कॉम्प्लेक्स ही स्किम उभी केली; तसेच एन-पाच मध्ये दोन प्लॉट विकसित करण्याचे त्यांनी हाती घेतले.

आठ फ्लॅट आणि १६ दुकानांची 'गंगोत्री' योजना पूर्ण झाली. तिथून पुढे सुरू झालेला प्रवास सुखकर झाला. सारा गार्डन, सारा नगर, एमराल्ड सिटी, सारा हार्मोनी, सारा रिद्धी, सारा वैभव, सारा वृंदावन, सारा सिटी, सारा कीर्ती, सारा समृद्धी, सारा भूमी आदी २५ प्रकल्प उभारले आहेत. यातून चार ते पाच हजार घरांची निर्मिती झाली. तुळजापूर येथे सारा गौरव, चाकण सारा सिटी हे महत्त्वांकाक्षी प्रकल्प उभारले आहेत.

चाकणमध्ये ६० किलोमीटरची टाऊनसिटी उभारण्यात येत आहे. 'क्रेडाई'च्या औरंगाबाद आणि पुणे शाखांचे ते सदस्य आहेत. संभाजी राजे साखर उद्योगचे संचालक, लायन्स मिडटाऊनचे सदस्य, खडकेश्वर मंदिराचे उपाध्यक्ष, अग्रसेन भवनचे विश्वस्त म्हणून कार्यरत आहेत. शनिभागवत, भागवतकथा, रामकथांचे आयोजन त्यांनी केलेले आहे; तसेच चिकलठाणा परिसरात एक गोशाळा सुरू केली आहे. व्यवसायाबरोबरच सामाजिक कार्यातही सीताराम अग्रवाल कायम अग्रेसर असतात.

(शब्दांकन : मधुकर कांबळे)